# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक १४५ वा ❑ मंगळवार दि.२२ जुलै २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## पतीने पत्नीकडे फोन आणि बँक पासवर्ड मागणे घरगुती हिंसाचारच

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्यं

जर एखादा पती नियमितपणे आपल्या पत्नीचा फोन तिच्या परवानगीशिवाय तपासत असेल, तर तो गोपनीयतेचा भंग आहे , जो भारतीय संविधानाच्या कलम २१ अंतर्गत मूलभूत अधिकार आहे. अशा कृत्याला भावनिक अत्याचार, सायबर-संबंधित गुन्हा आणि भारतीय कायद्यानुसार घरगुती हिंसाचार म्हणून वर्गीकृत केले जाऊ शकते . गोपनीयतेवरील या आक्रमणाला तोंड देण्यासाठी पत्नीकडे विविध कायदेशीर आणि व्यावहारिक पर्याय आहेत.

पती आपल्या पत्नीला तिचा सेलफोन किंवा बँक खात्याचे पासवर्ड शेअर करण्यास भाग पाडू शकत नाही आणि असे कृत्य गोपनीयतेचे उल्लंघन आणि संभाव्यतः घरगुती हिंसाचार ठरेल. वैवाहिक गोपनीयतेची गरज आणि पारदर्शकता तसेच नातेसंबंधातील विश्वास यांच्यात संतुलन असले पाहिजे.

छत्तीसगड उच्च न्यायालयाने अलीकडेच असा निर्णय दिला की पती आपल्या पत्नीला तिचा मोबाईल फोन किंवा बँक खात्याचे पासवर्ड शेअर करण्यास भाग पाडू शकत नाही आणि असे करणे तिच्या गोपनीयतेचे उल्लंघन ठरू शकते आणि ते घरगुती हिंसाचारात मोडू शकते.

न्यायमूर्ती राकेश मोहन पांडे यांनी यावर भर दिला की वैवाहिक संबंधांमध्ये सामायिक जीवनाचा समावेश असतो परंतु वैयक्तिक गोपनीयतेच्या अधिकारांचे उल्लंघन होत नाही.

न्यायालयाने स्पष्ट केले की ''विवाहामुळे पतीला पत्नीची खाजगी माहिती, संप्रेषण आणि वैयक्तिक वस्तूंमध्ये आपोआप प्रवेश मिळत नाही. पती पत्नीला तिचा मोबाईल फोन किंवा बँक खात्याचे पासवर्ड शेअर करण्यास भाग पाडू शकत नाही आणि असे कृत्य गोपनीयतेचे उल्लंघन आणि संभाव्य घरगुती हिंसाचाराचे उल्लंघन ठरेल. वैवाहिक गोपनीयतेची गरज आणि पारदर्शकता तसेच नातेसंबंधातील विश्वास यांच्यात संतुलन असले पाहिजे.''

न्यायमूर्ती राकेश मोहन पांडे

सध्याच्या प्रकरणात, याचिकाकर्ता-पतीने क्रूरतेच्या आधारावर हिंदू विवाह कायद्याच्या कलम १३(१)(-) अंतर्गत घटस्फोटासाठी अर्ज केला. प्रतिसादात, पत्नीने आरोपांना नकार देत लेखी निवेदन सादर केले.

खटल्यादरम्यान, पतीने दुर्गच्या वरिष्ठ पोलिस अधीक्षकांना (एसएसपी) त्यांच्या पत्नीच्या चारित्र्यावर संशय व्यक्त करून त्यांचे कॉल डिटेल रेकॉर्ड (सीडीआर) देण्याची विनंती केली.

त्यांनी कुटुंब न्यायालयातही असाच एक अर्ज दाखल केला ज्यामध्ये अधिकाऱ्यांना त्यांच्या पत्नीचे कॉल रेकॉर्ड देण्याचे निर्देश देण्यात आले.

तथापि, त्यांची याचिका फेटाळण्यात आली, ज्यामुळे त्यांना उच्च न्यायालयात जावे लागले. उच्च न्यायालयाने हा अर्ज कायम ठेवला आणि अस्पष्ट संशय एखाद्या व्यक्तीच्या गोपनीयतेच्या अधिकाराचे उल्लंघन सिद्ध करू शकत नाही यावर भर दिला.

उच्च न्यायालयाने के.एस. पुट्टास्वामी, पीपल्स युनियन फॉर सिव्हिल लिबर्टीज आणि मिस्टर एक्स विरुद्ध हॉस्पिटल झेड या खटल्यातील सर्वोच्च न्यायालयाच्या ऐतिहासिक निकालांचा हवाला देऊन संविधानाच्या कलम २१ अंतर्गत गोपनीयतेचा अधिकार हा मूलभूत अधिकार आहे हे प्रतिपादन केले.या निरीक्षणांसह, न्यायालयाने याचिकाकर्त्याची पत्नीच्या कॉल डिटेल रेकॉर्डची विनंती फेटाळली.

सीडीआर देण्यास कौटुंबिक न्यायालयाचा नकार

या सुनावणी दरम्यान पतीने त्याच्या पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेत दुर्गचे वरिष्ठ पोलीस अधीक्षक यांनी पत्नीचे कॉल डिटेल्स रेकॉर्ड देण्याची विनंती केली होती अधिकाऱ्यांना कॉल रेकॉर्ड देण्याच्या सूचना द्याव्यात अशी मागणी करत त्याने कौटुंबिक न्यायाला देखील असाच अर्ज केला होता मात्र उच्च न्यायालयात जायला सांगून त्याचा अर्ज फेटाळण्यात आला होता उच्च न्यायालयाने देखील या कोर्टाचा नकार कायम ठेवला आणि अस्पष्ट संशय एखाद्याच्या गोपनीयतेच्या अधिकाराचे उल्लंघन करण्यासाठी पुरेशा नसल्याचे न्यायालयाने म्हटले.

# उत्कृष्ट बालवाचकांचा सत्कार सोहळा

ज्योतिर्मय साहित्य

माजलगाव /जयश्री मुंडे – होमिओपॅथिक अकॅडमी अँड रिसर्च चॅरिटीज परभणी आयोजित उपक्रम ''उन्हाळ्याची सुट्टी पुस्तकांशी गट्टी'' या चळवळीत या संस्थेने आतापर्यंत तब्बल १५४ शाळांना वाचन पेटी वाटप केलेली आहे. आजचा समारंभ जिल्हा परिषद माध्यमिक शाळा माजलगाव या ठिकाणी आनंदात पार पडला. सतत उपक्रमाच्या प्रवाहात असणारे अध्यक्ष डॉ.पवन चांडक, प्रकाश डूबे स्पर्धा समन्वयक लक्ष्मण पोटभरे, विषय तज्ञ, विष्णू झोंबडे केंद्रप्रमुख, माननीय दीपक भालेराव संचालक रा.शा.म.शि.प. माजलगाव, श्रीकिसन देशमुख ज्येष्ठ अधिव्याख्याता अंबाजोगाई, बाळासाहेब सोनसळे प्रसिद्ध व्याख्याते या सर्व प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडला.




कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. त्यानंतर वडाच्या झाडाचे वृक्षारोपणाचे कार्य पार पडले. सर्व विद्यार्थ्यांना वृक्ष वाटप करण्यात आले.

त्यानंतर सर्वांच्या आकर्षणाचे आणि आवडीची बाब म्हणजे कार्यक्रमातील अप्रतिम रांगोळी आणि फलक लेखन श्रीमती जयश्री उत्तरेश्वर औताडे यांनी काढलेली सर्व विद्यार्थ्यांना सर्व शिक्षकांना फार फार आवडली. अतिशय सुंदर ट्रॉफी, प्रमाणपत्र आणि पुस्तकांचे आणि विद्यार्थ्यांच्या हस्तलिखित नोंद वह्यांची मांडणी केलेली होती. सर्व प्रमुख पाहुण्यांचे स्वागत हे पुस्तक वाटप, वृक्ष वाटप नी करण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या मनोगता नंतर उपक्रमात सहभागी असणाऱ्या शाळा त्या शाळेतील विद्यार्थ्यांचा मार्गदर्शक यांचा सत्कार सोहळा करण्यात आला. मुलांना प्रमाणपत्र, पुस्तक, ट्रॉफी, वृक्ष असे सर्व देण्यात आले. दुर्गम भागातील दहा शाळांचा यात समावेश होता.

इंदिरानगर समन्वयक श्रीमती. जयश्री उत्तरेश्वर औताडे, गावंदरा समन्वयक सौ. जयश्री अर्जुन मुंडे आणि बडे नवनाथ सर , मोहखेड समन्वयक विलास काळे सर, कापसे सर, उमापूर गेवराई समन्वयक भगवान फुंदे, धर्मराज करपे, शृंगारवाडी, कोथरूळ, ठाकरवाडी, हरकी निमगाव, निपाणी, टाकळी, या शाळेतील विद्यार्थी आलेले असून त्यांच्या समवेत अनेक पालकही उपस्थित होते.

धारूर तालुक्यातील दोन शाळा यात सहभागी आहेत. गावंदरा शाळेतून सृष्टी नवनाथ बडे, रागिणी रमेश बडे, प्रीतम सुभाष तिडके, तन्वी चंद्रकांत बडे या चारही विद्यार्थिनी इयत्ता दुसरीच्या वर्गातील असून त्यांचे चेहरे अतिशय आनंदी दिसत होते.

त्यांचा हा अनुभव त्यांना भावी आयुष्याला दिशा देणारा, आमूलाग्र बदल घडवून आणणारे निश्चितच ठरणार आहे. एच,ए.आरसी यांनी दिलेली वाचन पेटी ही मुलांना वाचनाची गोडी लावणारी आहे. अनेक दुर्गम भागातील मुलाना हे पुस्तक निश्चित संस्कारक्षम, सर्जनशील बनवणार आहेत. अशा समाजसुधारक चळवळीला आणि त्यांच्या तळमळ, धडपड युक्त कार्याला सलाम.

डॉ.पवन चांडक यांनी मुलांना वाचनाची गोडी कशी लावायची ? मुलांचा स्क्रीन टाइम शून्य करण्यासाठी वाचन किती महत्वाचे आहे हे सांगितले. डॉ.प्रकाश डूबे यांनी चळवळीचा उद्देश उपयोगिता आणि त्यातून होणारी फलनिष्पत्ती याविषयी माहिती दिली. विलास काळे सर यांनी संस्थेला एक वाचन पेटी दिली. एकमेकांना ऊर्जा प्रोत्साहन देणारे हे कार्य सर्वांना सोबत घेऊन जाण्यासाठी प्रेरणा देणारे आहे.

कार्यक्रमाचे सूत्र संचालन लक्ष्मण सरवदे सर यांनी केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन जयश्री औताडे यांनी केले. समाजाला, शिक्षकांना आणि पालकांना , विद्यार्थ्यांना असे कार्यक्रम ऊर्जा देणारे ठरतात. देखणे ते हात ज्यांना निर्मितीचे डोहळे मंगलाने गंधलेले सुंदराचे सोहळे वंदूया पाऊले त्यांची जे ध्यास पंथी चालती वाळवंटात ही हस्तीपद्मे रेखिती... कार्यक्रमाचे नियोजन इंदिरा नगर या शाळेतील सर्व शिक्षक स्टाफ यांनी केले . कार्यक्रमात सुसूत्रता होतीच शिवाय खिचडी आणि जिलेबी या नाश्त्याची सोय, पाण्याची सुविधा देखील उपलब्ध केलेली होती. या कार्यक्रमात सहभागी होण्याची विद्यार्थ्यांना आनंदी करण्याची सुवर्ण संधी दिल्याबद्दल शाळेतर्फे त्यांचे आभार मानण्यात आले.

# वि. ना. लांडगे यांना शिक्षणरत्न पुरस्कार

ज्योतिर्मय साहित्य

**सातारा** – हुतात्मा अपंग बहुउद्देशीय विकास कल्याणकारी संस्था ओगलेवाडी जि. सातारा ह्या महाराष्ट्रातील सर्व जिल्हे तसेच संपूर्ण भारत कार्यक्षेत्र असलेल्या व गेली २३ वर्षे आदर्श समाजकार्य करणाऱ्या संस्थेच्या वतीने ५ वा राज्यस्तरीय सह्याद्री गौरव पुरस्कार वितरण सोहळा २०२५ दिनांक १३ जुलै २०२५ रोजी दैवज्ञ सांस्कृतिक भवन सातारा येथे मा.ना. श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले, सार्वजनिक बांधकाम मंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाला.

प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील, विविध क्षेत्रात आपल्या कार्याचा, समाजमाध्यमामध्ये ठसा उमटविणाऱ्या काही मान्यवर व्यक्तिंना संस्थेच्या निवड समितीच्या एकूण २३ सदस्यांनी खूप परिश्रमपूर्वक शोध घेऊन त्यांची निवड करून त्यांच्या आदर्श कार्याची नोंद घेऊन त्यांना सन्मानीत केले आहे.

या सन्मानिय व्यक्तिंमध्ये शिक्षण क्षेत्रात गेली ५० वर्षे कार्यरत असलेल्या प्राचार्य श्री.वि. ना. लांडगे यांची शिक्षणरत्न या शिक्षणक्षेत्रातील सन्मानीय पुरस्कारासाठी निवड करण्यात आली व दिनांक १३ जुलै २०२५ रोजी दैवज्ञ सांस्कृतिक भवन सातारा येथे मा.ना. श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले, सार्वजनिक बांधकाम मंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे शुभहस्ते शाल, श्रीफल, पुष्पगुच्छ, सन्मानपत्र व सन्मानचिन्ह देऊन त्यांना सन्मानीत करण्यात आले.

त्याचबरोबर पद्मभूषण क्रांतिवीर स्व. डॉ. नागनाथ आण्णा नायकवडी यांच्या कार्याची धुरा सांभाळणारे संस्थापक अध्यक्ष डॉ. सुनिल फडतरे यांच्या संस्थेने व सर्व पदाधिकारी यांनी विविध क्षेत्रातील निवड केलेल्या इतर मान्यवरांचाही प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

श्री. वि. ना. लांडगे हे महाराष्ट्र मराठी माध्यमिक शिक्षक संघाचे राज्याचे अध्यक्ष, सातारा जिल्हा ग्रंथमहोत्सव समितीचे उपाध्यक्ष, राज्य अभ्यास मंडळाचे माजी सदस्य आहेत. पुणे येथे यशदा या शासनाच्या संस्थेत काही वर्षे मराठी विषयाचे मार्गदर्शक म्हणून काम केले आहे. महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमध्ये विविध शाळांतील विद्यार्थी व शिक्षक यांचेसाठी मराठी विषयाचे उद्बोधक वर्ग घेत आहेत. तसेच हेमलकसा, चंद्रपूर, गडचिरोली, राजूरा येथील अदिवासी शाळांतील विद्यार्थ्यांसाठी मराठी विषयाचे मार्गदर्शनसाठी जात असतात. ते खंडाळा विभाग शिक्षण समितीचे सन्माननीय संचालक आहेत.




श्री. वि.ना. लांडगे यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल खंडाळा विभाग शिक्षण समितीचे अध्यक्ष मा. शंकरराव गाढवे, उपाध्यक्ष श्री. पवार सर, संचालक श्री. पंडीत सर व संस्थेचे इतर पदाधिकारी व शिक्षक यांनी त्यांचे अभिनंदन केले. तसेच सातारा जिल्हा ग्रंथमहोत्सव समितीचे अध्यक्ष श्री. यशवंत पाटणे व दीपलक्ष्मी पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री. शिरीष चिटणीस व सरांच्या सर्व नातेवाईकांनी त्यांचे अभिनंदन केले.

# 'अस्मिता खेलो इंडिया महिला सायकलिंग लीग'चे यशस्वी आयोजन

ज्योतिर्मय साहित्य

**छत्रपती संभाजीनगर** – महिला सायकलपटूंना प्रोत्साहन देण्यासाठी आणि त्यांच्या कौशल्यांना राष्ट्रीय स्तरावर वाव मिळावा या उद्देशाने आयोजित करण्यात आलेली 'अस्मिता खेलो इंडिया महिला सायकलिंग लीग' स्पर्धा १२ जुलै रोजी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील बीडकीन, पैठण येथे मोठ्या उत्साहात पार पडली.

ही स्पर्धा खेलो इंडिया उपक्रमाअंतर्गत, क्रीडा प्राधिकरण (), भारत सरकार, सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडिया आणि सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र, स्पीड सायकलिंग स्पोर्ट्स असोसिएशन ऑफ छत्रपती संभाजी नगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली होती. स्पर्धेचे उद्घाटन सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडियाचे मार्गदर्शक सुदाम रोकडे सर व जिल्हा सायकलींग संघटनेचे अध्यक्ष तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी चंद्रशेखर घुगे (से. नि.) यांच्या हस्ते पार पडले.




या प्रसंगी सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र चे सचिव प्रा. संजय साठे, खजिनदार भिकन अंबे यांची प्रमुख उपस्थिती होती. स्पर्धेच्या अध्यक्ष स्थानी शेळके साहेब (बिडकीन पोलीस स्टेशन ) हे होते. स्पर्धेत बीडकीन, पैठण, छत्रपती संभाजी नगर शहर येथील ३०० ते ३५० मूली व महिलांनी स्पर्धेत सहभाग घेतला. तसेच बीडकीन पोलीस स्टेशन संपूर्ण स्टाफ यांची स्पर्धा यशस्वी करण्या साठी मदत झाली. तसेच रेड्डी स्पोर्टस् अकॅडमी चे बळीराम राठोड सर, प्रा युसुफ पठाण, सोनाली अंबे, रवी जाधव ( संघर्ष अकॅडमी) अनिल कांबळे, गणेश बनसोडे, भाऊसाहेब मोरे, पुजा अंबे यांचे सहकार्य लाभले.

**स्पर्धेचा अंतिम निकाल खालील प्रमाणे :**

सिनियर वूमन (१८ ते ३५ वर्ष) २० किमी
१. ऋतुजा गणेश खाटीक २. रजनंदिनी जाधव, ३. तनुजा पांडुरंग गाडेकर

ज्युनियर गर्ल्स (१६ ते १८ वर्ष) १० किमी
१. उज्वला रायफल रूपेकर, २. रोशनी चिंतामण चव्हाण
३. प्रिया विष्णु तिघोटे, ४. आरती लक्ष्मण सुरासे
५. भक्ती किसन हजारे

सब ज्युनियर गर्ल्स (१० ते १५ वर्ष) ५ किमी
१. संस्कृती संतोष गाढवे, २. दिव्या सुधीर हंकर
३. खुशी गणेश जाधव ४. पूजा गोविंद हिवाळे
५. श्रुती संजय हिवाळे

***







## जात्यावरच्या ओव्या......

येसच्या येसकरा
गल्ली झाडं निरमळ
येतीन महे भाऊ
पांढरे धोतर पाय घोळ ||१७८||

वाटच्या वाटसरा
काय पाह्यतो खेड्याला?
सोन्याचं कुलूप
माह्या दादाच्या वाड्याला ||१७९||

संदर्भ- शांताई इंगळे
संकलन- सौ. मनोरमा बोराडे
सहशिक्षिका, छत्रपती संभाजीनगर

# रेषा नात्यांचा आरसा




ज्योतिर्मय साहित्य

पती-पत्नीतील संबंध, घरातील नाती ही वाळूवरील रेषांसारखी असावी. काही तासात पुसल्या जाणाऱ्या रेषा. किती सुंदर कल्पना आहे, नाही ? पती पत्नीत भांडण झाले तर एका गाण्यात पती पुढाकार घेतो. तो म्हणतो, हा रुसवा सोड सखे, पुरे हा बहाणा, सोड ना अबोला. तर एका हिंदी गीतात एक पत्नी आपल्या पतीला म्हणते, रुठे रुठे पिया मनाउ कैसे ? रागाची मनात गाठ बांधून ठेवली की ती लवकर सुटत नाही. म्हणून ही निरगाठ असावी- लवकर सुटणारी. एका ठिकाणी तर रागाबद्दल असं म्हटलं आहे की राग म्हणजे दुसऱ्याच्या चुकीबद्दल तुम्ही स्वतःला करून घेतलेली शिक्षा ! म्हणून काही गोष्टी सोडून द्यायला शिकलं पाहिजे.



रामायणात आपण वाचतो की लक्ष्मणाने सीतेच्या संरक्षणासाठी एक रेषा त्यांच्या झोपडीभोवती एक रेषा ओढली होती. ती ओलांडून सीतेने बाहेर जाऊ नये असे त्याने सांगितले होते. हीच रेषा लक्ष्मण रेषा म्हणून प्रसिद्ध झाली. पण सीतेसाठी आखलेली लक्ष्मणरेषा केवळ एक सुरक्षा नव्हती, ती एक मर्यादा होती असाही त्याचा अर्थ आपल्याला घेता येईल.

नात्यांमध्येही अशा लक्ष्मणरेषा असतात स्वातंत्र्य आणि हस्तक्षेप यामधील सूक्ष्म सीमारेषा. सुसंस्कृत माणसं त्या पाळतात. त्या पार केल्या की सुसंवादाचं रूपांतर संघर्षात होतं.

एखाद्या पतीने पत्नीच्या स्वप्नांवर, तिच्या स्पेसवर अघोषित लक्ष्मणरेषा आखली तर?

एखाद्या पालकाने मुलाच्या प्रत्येक निर्णयावर नियंत्रण आणण्याचा प्रयत्न केला तर?

या रेषा मग लक्ष्मण रेषा राहत नाहीत. त्या बंदीरेषा बनतात आणि मग नात्याला गुदमरवतात.

खरी लक्ष्मणरेषा ही प्रेमाने आखलेली असते विश्वासाच्या वाळूवर.

ती रेषा पाळली गेली, तर नातं आरशासारखं झळाळतं.

कधी कधी आपण अनेकदा स्वतःभोवती एक अदृश्य रेषा आखतो ''माझ्या भावना कुणाला दिसू नयेत'', ''मी कोणावर अवलंबून नको.''

ही रेषा कधी संरक्षण बनते, तर कधी एकटेपणाचं कडवं आवरण.

जवळचं नातं या रेषेपर्यंत पोचतं, पण आत येऊ शकत नाही.

त्या रेषा माणसाला सांभाळतातही, पण खूप दिवस तशाच राहिल्या, तर त्या भिंती होतात. म्हणून त्यांच्या भिंती होणार नाहीत याची काळजी आपण घ्यायला हवी.

(क्रमशः)



## दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

# गुरूलक्षण

ज्योतिर्मय साहित्य

त्याच्या वक्तृत्वाला तेजोवलय प्राप्त झालेले असते त्याच्या जिभेवर प्रत्यक्ष माता सरस्वती विद्युलतेच्या तेजाने तळपत असते. तो समाजातील सर्व प्रकारच्या लोकांना बोधाचे रसपान देऊन त्यांची मने जिंकतो समाजातील अज्ञान अंधकार दूर होण्यासाठी अशा वक्तृत्व शैलीचा फार मोठा ऊपयोग होतो असा ऊत्तमोत्तम वक्ता असणे ही बुद्धीची करामत आहे. त्याच प्रकारे वेदांत उत्तमरीत्या सांगणे तो जगणे ही तर परमार्थाची गुरूकिल्ली आहे.

निश्चय


उत्तम वक्ता हा जसा कोणत्याही विषयावर आपल्या चातुर्याने रंग चढवतो. प्रसंगाला अनुरूप अशा कल्पना त्याच्या मनात आपोआप येतात. परंतु देहबुद्धीचे सर्व संदेह नाहीसे होऊन त्याच्या अंतर्यामी आत्मबुद्धीचा जय झालेला असतो. स्वस्वरूपाबद्दल त्याला निश्चयात्मक ज्ञान नसते. आत्मसाक्षात्कार होऊन स्वस्वरूपाबद्दल जे संपूर्ण संशयरहित ज्ञान होते त्यालाच समर्थ निश्चयअसा शब्द वापरतात.

आत्मज्ञान सांगत असताना बुद्धीची स्थिरता असणे फार गरजेची असते. ती जर नसेल तर समाजात गैरसमज पसरेल. म्हणून आत्मज्ञान असणे फार गरजेचे आहे.

''वोखटे''

संतांना समाजात सलोखा, शांती, आपापसात शांती बंधुभाव हवा असतो. असे विचार असणारेच संत होऊ शकतात. संत थोर महात्मे कधीही दोन माणसांत, दोन समाजात तेढ निर्माण होणार नाही या कडे बघतात.

(क्रमशः)



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

## संत हे भगवंताची आठवण देण्याचे कार्य करीत असतात.

ज्योतिर्मय साहित्य

ज्याला सत्याचे ज्ञान झाले तो सर्वज्ञच बनला; आणि जे या सत्याला धरून राहतात ते संत होत. संत आपल्याला मार्ग दाखवायला तयार असतात, परंतु आपला अभिमान आड येतो, आणि आपण संतांना नावे ठेवतो. एकजण संतांना उद्देशून म्हणाला, ''तुम्ही आमचे नुकसान करता; अपकार करणाऱ्यावरही उपकार करायला सांगून आम्हांला मेषपात्र करता.'' वास्तविक, आपल्या संतांनी कर्मांचा ढीग पाडला आहे, पण त्यांच्या आणि आपल्या कर्मांमध्ये फरक आहे. 'राम कर्ता' या भावनेने त्यांनी कर्म केले; आपण 'मी'पणाने करतो, म्हणून कर्म आपल्याला बंधनकारक बनते. संतांची कामगिरी कुणाला दिसत नाही; आणि आमची फक्त दिसण्यापुरतीच असते, त्यामुळे ती पुरी पडत नाही !

एखादा पुष्कळ ज्ञानी झाला, पण ते ज्ञान जर वृत्तीत उतरले नाही तर त्याचा काय उपयोग? जगाचे खरे स्वरूप समजून घेण्यासाठी जो सुखदुःखाच्या जाळ्यात सापडला नाही त्याच्याकडे जावे. तो साक्षित्वाने राहून जगापासून अलिप्तच राहतो. कर्म करूनही तो अलिप्त राहतो. आपण मात्र सुखदुःखात गुरफटून जातो. संताचे अंतःकरण शुद्ध असल्यामुळे त्याची शिव्यांची भाषासुद्धा न बोचणारी, किंबहुना आशीर्वादरूपच ठरते. सत्पुरुष काही विद्वान् नसतात. अती विद्वान् मनुष्य कोणी सत्पुरुष झालेला ऐकिवात नाही. कुणी आठव्या वर्षीच घरातून निघून जातो, तर कुणी लग्नातून पळून जातो, तर कुणाला लिहायला-वाचायलाही येत नाही, असे लोक सत्पुरुष झालेले आढळतात. संतांनी देह सोडल्यावर सुद्धा लोकांना त्यांचे अस्तित्व भासते.

लहान मूल बाहेर खेळत असते, परंतु मध्येच त्याला आईची आठवण होऊन तिच्याकडे धावते. याचा अर्थ असा की, मुलाला आईचे सूक्ष्म स्मरण सतत असते. तसा भगवंताचा चटका, तशी त्याच्या अस्तित्वाची जाणीव, तशी त्याची निष्ठा, आपल्याजवळ पाहिजे. भगवंताची अशी तळमळ लागली की मनुष्य वेडा बनतो. त्या स्थितीत त्याला कुणी संत भेटला की तो निवांत होतो. संत हे खरोखर आईसारखे आहेत. ते आपल्याला भगवंताची आठवण देण्याचे कार्य करीत असतात. सर्व जगावर संतांचे उपकार आहेत. त्यांनी परमात्म्याला सगुणात आणले आणि तो आपल्याला सुसेव्य केला; परमात्म्याला आपलासा करून घ्यायला नामस्मरण हे सोपे साधन दिले; एकनाथी भागवत, ज्ञानेश्वरी असे सोपे सद्ग्रंथ निर्माण केले; आणि यथाशक्ती अन्नदान करणे हेच कलियुगात उत्तम साधन आहे असे सांगितले. या चार गोष्टी आचरणात आणायचा प्रयत्न ज्याने केला, त्याला काही कमी पडणार नाही; नेहमी समाधानच राहील.

जग संतांशिवाय असणे शक्य नाही; आम्हांला त्यांना ओळखता येत नाही.

***

## ॥ संत महात्म्य ॥

लेखक - मधुकर बोरीकर
9403061886

### संत ज्ञानेश्वर महाराज यांचा अभंग

ज्योतिर्मय साहित्य


प्रस्तुत अभंगात एका विशिष्ट गाईचे वर्णन केलेले आहे. इथे गाय हे रूपक मनासाठी वापरले आहे. आपले मन सदैव विविध मनोरथे करण्यात गुंतलेले असते. संकल्प विकल्प, संशय, शंका याचे अमाप पीक मनात सदैव उत्पन्न होत असते. म्हणून

आधी चरे पाठी प्रसवे कैसी प्रतिदिन गाभासी जायेरे

असे म्हटले आहे म्हणजे मनोरथ रचणारे हे मन आधी संकल्प विकल्प करते. म्हणजे ती गाय प्रसवते. मनात रचलेले संकल्प, मनोरथ हे पूर्ण करण्यासाठी जीवाला प्रवृत्त करते. अशा रीतीने ती दररोज गाभा जाते आपल्या मनात निर्माण होणारे मनोरथ क्वचितच पूर्ण होतात. बहुतांश वेळा ती असफल होतात. व आपण दुःखी होतो. जे मनोरथ पूर्ण झाले नाहीत यामुळे मनो रुपी गाय ही वांझ झाली आहे असे म्हटल्या जाते. म्हणजे संकल्प करून ही गाय प्रसवते तर संकल्प पूर्ण न झाल्याने ही गाय दररोज वांझ होते. विविध इच्छा कामना यामुळे दररोज प्रसवूनही त्या इच्छा आकांक्षा फलद्रूप न झाल्यामुळे दररोज वांझ ठरणारी ही मनरूपी गाय आहे. ही गाय या ताना खाली विकलांग होते, वाळलेली, अशक्त होते. उन्हाळ्यात गाय ज्याप्रमाणे कमी दूध देते त्याप्रमाणे विषयात गुंतलेले मन हे रुग्ण अशक्त होते. याचाच अर्थ मनात विचारांचे काहूर माजने, एकाच वेळी असंख्य विचार येणे, कामाचे थोडे पण बिनकामाचे असंख्य विचार मनात घोंगावत राहणे व आपली कार्यशक्ती संपुष्टात आणणारी ही मनरूपी गाय ही विषयाकडे आसक्त झाल्यामुळे कशी शक्तीहीन चंचल व दुर्बल झाली हे कळेल. तीच गाय मग सद्गुरु च्या परिस स्पर्शाने तीस नवजीवन मिळते. समर्थ सद्गुरु मनाला विषयाकडून परावृत्त करून बुद्धी कडे वळवतात. त्याच वेळेस प्राण उर्ध्वरेता होतो. बुद्धीत कल्पनांचे धुमारे उठणे मंदावते व बुद्धीही विषयाकडे न वळता आत्म्याकडे वळते. मी तू पणाची भावना संपते. विचारांचा उदभव मंदावतो व प्राण मन व बुद्धी आत्म्याकडे वळतात. अहंकार लीन होतो(शरीराची जाणीव संपते).

वर सांगितल्याप्रमाणे सुदृढ, निरोगी मनात विचारांचा उदभव कमी असतो. म्हणजे मनातील विचार हे खूप खूप उशिराने एखादा विचार मनात तरळतो. मनातील संकल्प मनोरथे थांबतात. व मन हे निरोगी सुदृढ होते. यालाच मनरूपी गाय पुष्ट झाली आहे असे म्हटले आहे.

विषया संबंधीचे ज्ञान याला अध्यात्मात अज्ञान म्हणतात. जेव्हा अज्ञानात या मनरूप गाईचे दोहन करू गेले असता ही या गाईच्या स्तनातून प्रचंड मोठ्या प्रमाणात दुग्धधारा वाहू लागतात. जणू काय पर्वतावरून वाहणाऱ्या पाण्याच्या लोटा प्रमाणे त्या दिसतात. म्हणजे विचारांचे थवेच्या थवे एकापाठोपाठ एक याप्रमाणे मन प्रसवत राहते. विषयाकडे वळलेले मन हे विकारांच्या प्रभावाखाली कायम येत राहते आपणास विविध गोष्टींचा मोह होतो. मोह हा विकार जर जडला तर मनरूपी गाय ही दोहन करणाऱ्यालाच लाथ घालते. म्हणजेच मनात उत्पन्न होणारे संकल्प विकल्प हे आपणास असफल करतात. आपणास दमवून टाकतात.दुःखी करतात. आपली प्रतिभा कमी करतात. मनरूप गाईला राहण्यासाठी भोग्य भोक्ता व भोग ही त्रिपुटी रूप निवासस्थान राहण्यासाठी दिलेले आढळते. मनात मि तू पणाचा भाव प्रबळ झालेला असतो त्यामुळे या देहा करवी घडणारी कर्मे ही आत्म्या कडून म्हणजे आपल्याकडून घडली आहेत असे आपणास वाटते. त्यामुळे द्वैत भावात मन सदैव वावरत असते. पण जेव्हा सद्गुरु ची कृपा होते कुंडलिनी जागृती होते. साधक साधना रत राहतो. मन हे बुद्धीकडे वळते आणि बुद्धी ही आत्म्याकडे वळते आणि ती तिथे स्थिर होते. यावेळेस मन हे मृत्युमुखी पडल्यागत झालेले असते. समाधी अवस्था प्राप्त होते. विकारांचे दोष मनातून संपवले जातात. प्राण उर्ध्वरेता झाल्यामुळे शरीरात प्रचंड योगाग्नि वाढतो. यातच विकारांची किल्मिशे जळून जातात. मन हे दोष रहित होते, व ते बुद्धीत विलीन होते. बुद्धी आतम्याकडे वळते. मनाचा येथे लय होतो. **(क्रमशः)**







# हळदीच्या सेवनाने झपाट्याने कमी होईल खराब कोलेस्ट्रॉल?

ज्योतिर्मय साहित्य

प्राचीन काळापासून हळदीचा वापर आरोग्यासाठी केला जातो. कोलेस्ट्रॉलच्या समस्येवरही हळद उपयुक्त ठरू शकते. फक्त वापरण्याची पद्धत एकदा जाणून घ्या.

हळद आपल्याला प्रत्येक घरामध्ये पाहायला मिळते. हळदीचा वापर सामान्यतः घरांमध्ये जेवण चवदार बनवण्यासाठी केला जातो. त्वचेचे सौंदर्य वाढवण्यापासून ते रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठी हळद खूप फायदेशीर आहे. हळदीचा वापर प्राचीन काळापासून संसर्ग, जखम आणि पोटाच्या समस्यांसाठी केला जातो. हळद हा अनेक पोषक तत्वांनी समृद्ध आहे जी कर्करोग आणि मधुमेह यांसारख्या रोगांवर उपचार करण्यास मदत करते.

हळदीचे आरोग्यदायी फायदे बाजारात सहज उपलब्ध आहेत आणि ती विविध प्रकारे वापरली जाऊ शकते. हळद रक्तातील कोलेस्टेरॉल नियंत्रित ठेवून हृदय निरोगी ठेवण्यास देखील मदत करू शकते. चला जाणून घेऊया हळदीचे सेवन कोलेस्टेरॉल नियंत्रित करण्यासाठी कसे उपयुक्त ठरते?

**हृदयविकारात फायदेशीर**

शरीरात उच्च कोलेस्ट्रॉल म्हणजे तुम्हाला हृदयविकाराच्या झटक्यापासून स्ट्रोकपर्यंत कोणत्याही गोष्टीचा धोका असू शकतो. अशा परिस्थितीत हळदीसोबत कोलेस्टेरॉलची पातळी राखण्यासाठी वेळोवेळी अनेक अभ्यास आणि संशोधन केले गेले आहेत. प्राणी आणि मानवांवर केलेल्या संशोधनानुसार हळदीचे सेवन केल्याने रक्तातील कोलेस्टेरॉलच्या पातळीवर तीन प्रकारे परिणाम होतो.

१) कोलेस्टेरॉलची पातळी कमी करणे...

लो-डेन्सिटी लिपोप्रोटीन म्हणजेच कोलेस्टेरॉलला वाईट कोलेस्ट्रॉल म्हणतात आणि त्यामुळे हृदयाच्या गंभीर समस्या उद्भवू शकतात. हळदीचे सेवन केल्याने एलडीएल कोलेस्ट्रॉलची पातळी कमी होते आणि शरीरातील चांगल्या कोलेस्ट्रॉलची पातळी वाढते, ज्यामुळे आरोग्य सुधारण्यास मदत होते.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

२) ऑक्सिडेशनपासून एलडीएल कोलेस्टेरॉलचे संरक्षण

एथेरोस्क्लेरोसिस तेव्हा होतो जेव्हा एलडीएल कोलेस्टेरॉल ऑक्सिजनसह प्रतिक्रिया देते, ज्यामुळे रक्ताभिसरणात अडथळा येऊ शकतो. हळदीचे सेवन केल्याने हे ऑक्सिडेशन थांबते, त्यामुळे कोलेस्ट्रॉल नियंत्रित राहते आणि रक्तवाहिन्याही निरोगी राहतात.

३) ट्रायग्लिसराइड पातळी कमी करणे

उच्च रक्तातील कोलेस्टेरॉलसह उच्च ट्रायग्लिसराइड पातळी हृदयाच्या आरोग्यास धोका निर्माण करू शकते. ट्रायग्लिसराइड देखील धमन्यांमध्ये तयार होते, ज्यामुळे कोलेस्टेरॉल रक्ताभिसरण समस्या निर्माण करणे सोपे होते. हळदीच्या वापराने ट्रायग्लिसराइडचे प्रमाण नियंत्रित करता येते.

हळदीमध्ये अँटीबॅक्टेरियल गुणधर्म असतात. खराब कोलेस्टेरॉल कमी करण्यासाठी रोज भाज्यांमध्ये हळदीचा वापर करावा. तसेच रात्री झोपण्यापूर्वी एक ग्लास दुधात चिमूटभर हळद टाकून प्यावे.

याशिवाय रोज एक कप ग्रीन टी प्यायल्याने उच्च कोलेस्ट्रॉलची पातळी कमी होण्यास मदत होते.

***

## ॥ श्री राम कथा ॥



वक्ते : आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर

ज्योतिर्मय साहित्य

सीता म्हणे यांना कोणी वाली नाही का? आहे ना !क्षत्रियांनी त्यांचे रक्षण करावे. मग सीता म्हणे, मग तुम्ही का यांना मारत नाहीत. मग हे धनुष्य बाण काय तुम्ही शोभेसाठी बाळगता काय? राम सीतेकडे पाहून फक्त हात जोडून स्मित करतात.सीता मनोमन वरमली. ती म्हणाली, तुमच्यावर मी वृथा आरोप केला.

कथा ऐकता ऐकता धावते संकलन
मधुकर बोरीकर, 9403061886

अगस्त्य मुनीकडे हे तिघे गेले.

रावणाच्या पारिपत्या साठी शास्त्र साठा निर्माण करणारा, पहिला महा पुरुष अगस्त्य होते. अनेक दिव्य शस्त्र अस्त्र त्यांनी रामांना दिली.

अगस्त्य म्हणाले, आता तुम्ही इतरत्र जाऊ नका. तुम्ही पंचवटिस जा. तिथे गुहेत राहा.अगस्त्य यांचा आश्रम प्रवराचे तिरी होता.रामांनी जवळच गोदावरीचे तिरी रहावे. म्हणजे वारंवार तुम्हास भेटता येईल.

अगस्त्य पत्नी सितेस म्हणाली १. अपरिचित व्यक्तीवर अजिबात विश्वास ठेऊ नको. २. या दोघांपैकी किमान एका जवळ तू कायम रहा.इथे मायावी राक्षस खूप आहेत.ते मायावी अनेक रूपे घेऊन वेगळ्या वेगळ्या आवाजात बोलतात व फसवतात. हा उपदेश सीता मातेने ऐकला व असाच प्रसंग पुढे घडून आला. जर हा उपदेश तीने अंगी बाणला असता तर तसे झाले नसते.

प्रभु पंचवटी कडे जात असता त्यांना जटायू भेटले. ते म्हणे दशरथ कसे आहेत.ते माझे मित्र होते.

(क्रमशः)

## फुलमाला....





अग्निशिखा (कलीहारी) फुल..

अग्निशिखाची फुले खूप सुंदर दिसतात
याची हिरवीगार असते पाती
पिवळी फुले पण लाल टोके पाहता
वाटते जशा पेटलेल्या ज्योती...

ही फुले कोकणात भक्तिभावाने गौरी, गणपतीला वाहतात,
यामध्ये आयुर्वेदिक गुण भरपूर तरी विषारी म्हणुन तिला दूर ठेवतात...
लक्ष्मण मूर्च्छित झाल्यावर मारुतीने उचलून आणला पर्वत द्रोणागीरी
अशी मान्यता आहे की अग्निशिखा या फुलांचा शुद्धीवर आणण्यास उपयोग झाला भारी..

सौ.माधुरी म.इनामदार, मिरज





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

## रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

ज्योतिर्मय 📖 साहित्य

### शांतिनिकेतन ते विश्वभारती

थोरांची चरित्रे, राष्ट्रप्रेम, सदाचार यासारख्या लहान मुलांच्या वयाला न पेलणाऱ्या गोष्टी त्यांनी आपल्या पाठ्यपुस्तकात ठेवल्याच नाहीत. या गोष्टींना त्यांचा विरोध होता अशातला भाग नव्हता परंतु मुलांना सहजपणे कसे शिकता येईल त्यांचे शिक्षण आनंददायी कसे होईल यावर त्यांचा भर होता. त्यांनी मुलांचे बालसृष्टीतील मित्र होऊन, त्यांच्या पातळीवर जाऊन या पाठ्यपुस्तकांची निर्मिती केली. या पाठ्यपुस्तकातील एक एक धडा म्हणजे सुंदर शब्दचित्रच आहे ! सभोवतालच्या जगाचे निरीक्षण करता करता मुले सहजपणे यातून शिकत जातात आणि आपण काही शिकतो आहोत याची जाणीव न होता सहज शिकत जातात हे या पाठ्यपुस्तकांचे वैशिष्ट्य आहे. यातील पाठ गाता येतात, पाहता येतात, ऐकता येतात आणि अनुभवता येतात.

शांतिनिकेतनमध्ये त्यावेळी प्रख्यात चित्रकार नंदलाल बोस विद्यार्थ्यांना चित्रकला शिकवत. त्यांच्या सुंदर चित्रांनी ही पुस्तके नटलेली आहेत. रवींद्रनाथांचे शब्द आणि नंदलाल बोस यांची बोलकी चित्रे यांचा सुरेख संगम या पाठ्यपुस्तकांमध्ये झाला आहे. पु ल देशपांडे यांनी शांतिनिकेतनमध्ये काही काळ वास्तव्य केले होते. या पुस्तकांबद्दल बोलताना ते म्हणतात, ‘‘माझ्या शांतीनिकेतन मधल्या वास्तव्यात या सहजपाठांनी माझे हरवलेले बालपण मला परत आणून दिले. ज्याला म्हणून बंगाली शिकायचे असेल त्याने सहजपाठाचे हे चार भाग पुन्हा पुन्हा वाचावेत. बंगाली भाषेच्या अंगाखांद्यावर खेळल्यासारखे वाटेल. सहजपाठ म्हणजे गुरुदेवांचे बंगालवर असलेले महान उपकार ! ‘‘

बंगालमधील खेड्यात राहणारी मुले मुली डोळ्यासमोर ठेवूनच रवींद्रनाथांनी हे सहजपाठ लिहिले. सकाळचे वर्णन ते किती सुंदर करतात ते पहा

आलो हॉय - गॅलॉ भोय, चारी दिक झिक मिक -
( उजेड होतो, भय जाते, चारी बाजूला झुंजूमुंजू होते )

हे सगळे मुले गात गात आनंदाने म्हणू शकतात. सकाळ झाल्यानंतर गावातील माणसे कशी कामाला लागली याचेही चित्र सोप्या शब्दातून ते मुलांसमोर उभं करतात

पाडे पेरू हरी हर
मधू राय बांधे घर
होडी हाके पातू पाल
धान्य आणे जयलाल
धरे सुकाणू दीनानाथ
अविनाश रांधे भात.

आपल्याकडे शाळेतील मुलांना कविता पाठ केल्या की परीक्षेला मार्क मिळतात एवढेच ठाऊक. परंतु त्यातून मिळणाऱ्या आनंदाला ही मुले पारखी होतात. कविता या चालीवर सुंदर गाता येतात, त्या म्हणताना नाचता येते त्या गात गात भाषा शिकता येते, याची जाणीवच आमच्याकडे करून दिली गेली नाही. बंगालमधील मुले खरोखरच भाग्यवान म्हणावी लागतील कारण रवींद्रनाथांनी त्यांना शेकडो सुंदर गाणी रचून दिली. त्या गीतांना सुंदर चाली लावल्या गेल्या. बंगाली माणसाचे बालपण या गीतांनीच समृद्ध झाले. **(क्रमशः)**

## ऑनलाईन औषधोपचार




आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज, गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्ड्स् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे. सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.

Dr Shaikh A H - 98606 99906

# हसाल तर असाल आणि असाल तरच हसाल....

ज्योतिर्मय 📖 साहित्य



आपण फुलांच्या विविध रंगांचा आनंद घेत असतो. हिरव्या निसर्गातील विविध रंग छटा मानवी मनाला नेहमीच प्रसन्न करत असतात. प्रत्येकाची रंगाची आवड निवड वेगळी असते. निसर्ग तर सुंदर आहेच. आणि जीवनात जगण्याचा खरा रंग म्हणजे हास्य रंग.विनोद आणि हास्य यांची मैत्री फार जवळची आहे.

विनोद आला की हास्य फुलणारच यात काही शंका नाही. विनोद हा माणसाच्या मनाचा चांगुलपणा मान्य करतो. विनोद ही सुध्दा एक कलाच आहे.विनोद बुध्दीने जगल्यास ,जगण्याचा आनंद निश्चित वाढतो, आरोग्य हसतं . विनोद म्हणजे मनाची प्रसन्नता. विनोद म्हणजे संभाषणाची चव वाढविणारे मीठ. विनोदाचे जसे वेगवेगळे प्रकार असतात, तसेच हास्याचे वेगवेगळे प्रकार असतात.

कुणी मनमुराद हसतं तर कुणी हळूच, मुरक्या मुरक्या हसतं. तर कोणी कधी गोड हसतं . कुणी स्मित करतं तर कुणी खळखळ हसतं. कुणी कधी तरी अचानक फिदफिद हसतं. हसताय ना. कसे ? ते मी नाही विचारणार. आरश्यात बघा म्हणजे तोच सांगेल.

एकदा असेच आम्ही मित्रमंडळी रात्री जेवण झाल्यावर गप्पा मारत बसलो होतो. गप्पा रंगत आल्या आणि अचानक एकाने जोरात ढेकर दिला आणि आम्ही बाकी मित्र खुप हसलो आणि त्याला म्हणालो अरे थोडं कमी जेवत जा, रात्रीच्या वेळेस. वयाची पन्नाशी होऊन गेली आहे आपली. अचानक दुसरा मित्र म्हणाला बरं झालं बाबा ढेकरच दिलास, नाही तर या वयात म्हणे आजकाल पोटात गॅसेसचे प्रमाण वाढत असते आणि नको तसे आवाज कानी पडतात आणि पुन्हा सारे हसले मी त्याला म्हणालो,

अरे या वयात म्हणे काय म्हणतोस, तुला अनुभव नाही का ? आणि पुन्हा हास्याची खसखस पिकली.

गमतीचा भाग वेगळा पण खरच हास्याचे रंग हे जीवनात खुप महत्वाचे असतात. नुसती कल्पना कराकी जीवनात हास्य नसते तर? जीवन किती निरस, रटाळ झाले असते. आनंद व्यक्त करण्यात अडचण आली असती. हास्य हे बिन पैश्याचे टॉनिक आहे, हास्य हे निराश मनावरचे सुंदर औषध आहे. अधून मधून हसत राहिले की मन निराश राहत नाही.निखळ हास्य हे आरोग्याला खुप फायदेशीर असतं. हसल्याने चेहऱ्यावरचे स्नायू मोकळे होतात. रक्ताभिसरण चांगले होते आणि आरोग्य ही हसत राहतं

आजकाल बऱ्याच ठिकाणी हास्यक्लब निघाले आहेत. आमच्या घराच्या शेजारीच सकाळी सकाळी हास्याचे फवारे ऐकू येतात हा हा हा, ही ही ही, मात्र विनाकारण



मनोरंजन

गिरीश वसेकर( देशपांडे)
नांदेड सिटी,पुणे ९४२२६५९४००

एकट्याने उगीचच दिवसभर आपलं सतत हसत राहु नये नाही तर उगीच वेगळा अर्थ निघेल.

हास्य हे हृदयातून आले पाहिजे. आपले ओठ व मन उघडे करून हसणारे व्यक्ती नेहमीच सर्वांना आवडते कारण त्यातून मोती आणि आत्म्याचे दर्शन घडते. हास्य ही जीवनाची संजीवनी आहे.हास्य हे आनंदाचे व्यक्त रूप आहे. मी तर म्हणेल हसाल तर असाल आणि असाल तरच हसाल.

मात्र एक सांगू दुसऱ्यावर कधीच हसू नये. दुसऱ्यावर हसणे खुप सोपे असते पण स्वतःवर हसणे खुप अवघड आहे. मात्र दुसऱ्याच्या चेहऱ्यावर हास्य फुलविले तर आनंदी आनंदच.

एक गंमत सांगतो. आम्ही चार वर्षापूर्वी पुणे येथील उंच २८ व्या मजल्यावर राहत होतो.तेथील लिफ्ट खुप मोठ्या होत्या. आम्ही उभयता लिफ्ट मधे बऱ्याच वेळेस जात, येत असत,आणि आमचा २८ व्या मजल्यावर येई पर्यंत बऱ्याच वेळेस मधल्या मजल्यावर कुणी येत, कुणी जात असत.

एकदा मी आणि माझी बायको सोबत लिफ्ट मधे गेलो होतो.एक आई आणि तिचं छोट गोड बाळ आलं. अंदाजे ०६ महिन्याचे असेल ते. ते त्याच्या टपोऱ्या गोल डोळ्याने माझ्याकडे बघू लागलं.मी त्याला शुकशुक करताच ते पुन्हा गोड हसलं.त्या हसण्यात खुप निरागसता होती. कदाचित त्याला माझ्या डोक्याची गंम्मत वाटली असावी.कारण त्याला जावळ कमी आली होती आणि माझी गेली होती.त्याला मी मित्र वाटलो असेल कदाचित.

अचानक ती आई मधल्या मजल्यावर उतरून गेली. इतक्यात माझी पत्नी रचना मला म्हणाली, अहो गिरीशराव असे, मधेच कुठेही शुकशुक करत जाऊ नका. मी होते म्हणून ठीक नाही तर एखादया वेळेस भलतचं वांधं व्हायाचे. आणि

आम्ही दोघे हसलो मी पुढे तिला म्हणालो मी एकटा असताना असे कधीच करत नाही, नाही तर आता पर्यंत माझे सगळेच दात पडले असते. माझे तर ३२ दात शाबूत आहेत . हो मित्रानो, हास्य आणि उत्साह हे जिवंतपणाचे लक्षण आहे. आणि हसऱ्या चेहऱ्याचे सर्वत्र स्वागतच होत असते. मानवी मनाला हर्ष भावनेचा स्पर्श झालाच पाहिजे म्हणजे मन कधी नकारात्मकते कडे सहसा जात नाहीं.आणि हो विनोदात ही सहजता असावी.

दोन मित्र गप्पा मारत असतात. त्यातील एक मित्र म्हणतो आपल्या गणिताच्या मॅडम आहेत ना,त्यांनी बागेत रोपलावले होतं, बघ त्याला किती छान आली आहेत.

पण विनोद आणि हास्य याचाही अतिरेक होऊ नये.दुसरे असे एक उदाहरण सांगतो.

एक औषध विक्रेता केस वाढविण्याच्या तेलाची जाहिरात करू लागला. वारेमाप स्तुती करत तो सांगत होता की या तेलामुळे डोक्यावर केस किती भरभर वाढतात ? अंहो तुम्हाला काय सांगू की एका सज्जन गृहस्थाने या तेलाच्या बाटलीचे बुच दातांनी ओढून काढले, तेल ओठाला लागले आणि पुढे पाच मिनिटातच काय चमत्कार झाला? तो सोबत ठेवलेल्या पोस्टर वर चित्रात दाखवत होता. हे मात्र अति झाले बरं का?

हळूहळू आमची लिफ्ट २८ व्या मजल्यावर पोहचली.आपल्याच घरातजावं लागेल ना?उगीच दुसऱ्याच्या घरात कशाला? सकाळी सकाळी,चहाला धाड ? म्हणुन आपल्याच घरात गेलो, मात्र कुणी आवाज दिला तर चहाला नाही म्हणत नाही बरं का.

# धूक्यातला तो एक थेंब

ज्योतिर्मय 📖 साहित्य



आज पुन्हा एकदा वाटते
त्याच रस्त्याने चालावे.
लिंब बाभळ कार, घाणेरी
हिरव्यागार त्या गवतातून
नि काट्यातून आठवणीचे
फुल पुन्हा एकदा फुलावे.

गवतावर पडलेले ते दैवर पाना पानातून टप टपणारे थेंब आणि अंगावर पडणारा तो पाऊस अलगद मनातल्या मनाला भिजवत चिंब करून गेला. का कोणास ठाऊक डोंगर पायथ्याला असलेली ती आडवी सडक पाहण्याची आज खूप इच्छा होते. आज हे चित्र पाहिलं.

खूप दूरवर हरवलेल्या त्या अनामिक सावल्या आवसं पूनवसारख्या येतात जश्या काळ्या पापण्यात मोती होऊन सारा जीवनपट उलगडून घरंगळून नवी ऊर्जा देऊन जातात.

किती छान आयुष्य होते ना ! म्हणजे आताही आहे. नाही असे नाहीच. पण.. एक प्रश्न चिन्ह कुठूनतरी सतावतेय. निसर्गाच्या सानिध्यात कौलारू विटा मातीच्या घरात गुण्यागोविंदाने एकत्र नांदणारे प्रेम, माया, ममता उचंबळून जणू अंगणातल्या तुळशीजवळ असलेल्या त्या निरांजनाची ज्योत पडणाऱ्या त्या पावसाला पहात स्वतःत सामावू पाहतेय असे वाटते. मागील दारच्या बाभळी मागचा तो ढगा आडून डोकावणारा चंद्र पावसात भिजतो की काय अशा त्या बाळ मनाच्या कल्पना, वचनीला धरलेले हात, शाळेत जाताना घेतलेली पोत्याची खोळ, समोर पडलेल्या त्या इंद्रधनू परी सप्तरंगात उमलतायेत असे कुठेतरी वाटत राहते.

बी बिवड युरिया सल्फेट वगैरे ‘‘आर! कुठलं बियान आणल रं!‘‘ ‘‘महाबीजच.‘‘ आड तासाला काय पेरणार व तायसाब, आणि मोगणाला घेवडा मुग की चवळी राखेत ठेवलेल्या उतरंडीतून नाहीतर पत्र्याच्या डब्यात ठेवलेल्या कडधान्यांचा तो खडबड आवाज खोल कानात उमटतो आहे.

कोवळ्या कोवळ्या तनाने फुललेले शिवार रस्त्याच्या कडेला उगवलेले कोवळं कोवळं गवत आणि त्याखाली विसावलेले ते



ललित...

सौ. वैशाली महाडिक-जाधव
श्री क्षेत्र निनाम - सातारा
मो. क्र. - ९७६७४३७९२३

छोटे छोटे थेंब आज माहीत नाही कुठून डोळ्यासमोर आले. पेरणीच्या वेळी मोकळे झालेले दोन तीन शेते सोडून उडून गेलेलं ते पोते (ठेके) कुठून तरी नजरेसमोर येतेय. एकदा येऊन गेल्यानंतर शहारलेल्या त्या मातीत माती होऊन एकरूप होण्यासाठी पुन्हा काही वेळाने सरसर करत येणारी ती वांबळ आणि त्याच्यामुळे उडालेली तारांबळ, शिवाराच्या अख्ख्या धडीच्या धडी पांढऱ्या रंगानी फुलून आलेल्या दिसायच्या. शिवारात घुमलेला बैलांच्या घुंगराचा तो ताल आज कानात घुमतो आहे. त्याच्या सोबतीला कोवळे लुसलुशीत गवत आणि चरणाऱ्या त्या गायी म्हैशी वासरे खोरी खोरीतून दिसणारी ती छोटी छोटी घानेरीची झुडपे अन् त्यात दिसणारी ती वासरे आज त्या पावसाच्या सरीतला एक थेंब मोती होऊन जणू ओंजळीत सामावते.

पण का कुणास ठाऊक आज हे चित्र खूप काही सांगून गेले. मोकळी हवा, सुंदर हिरवगार परिसर डोंगर माथ्यावर उतरलेले ते धुके घराच्या दिशेने चालणारी ती गायी गुरे आणि कान हलवल्या नंतर होणारा गळ्यातल्या घंटीचा आवाज एका अनामिक ओढीने चिखल तुडवत चालणारे अनवाणी पाय.. पण अशाच एका वेळी पायी रुतलेला तो सड सडंबा आज कुठेतरी सलत राहतो. अन् डोंगरावर उतरलेल्या धुक्यातला थेंब थेंब होऊन धुक्यात विरतो आहे असे वाटत राहते.

पण असं शिवार आज पाहायला मिळत नाही. नाही असे नाही, पण खूप कमी पाहायला मिळते. शेती आजही आहे तिथेच आहे. पण त्याच्यातला तो गावरान गोडवा शोधता शोधता म्हटले तरी सापडत नाही. असे मला तरी वाटते. असो! ठीक आहे काळाबरोबर चालणे हीच काळाची गरज आहे.

**(क्रमशः)**



## इंदापुरी निखारे

### लाडकी मैत्रीण



ज्योतिर्मय 📖 साहित्य

आज एक वर्ष होऊन गेले...

पण कोणीही साधा विचार पण केला नाही...

सामान्यांना कोणीच विचारतच नाही...

कसं होणार ? एक अजून अनुत्तरीत प्रश्न..

हा प्रस्ताव देऊन एक वर्ष झाले...

अशा कामात दिरंगाई नसावी आणि कारण सामान्य माणूस फक्त कायद्यानुसार वागत असतो...

तो रस्त्यावर,ऑफिस मध्ये किंवा लपूनछपून करत नाही किंवा मंत्रालयात येऊन मारामाऱ्या पण करणार नाही...

लाडकी मैत्रीण योजना - अतिशय लक्षवेधी, तारांकित प्रश्न आणि तरीही दुर्लक्षित...

लाडकी मैत्रीण असणाऱ्या व्यक्तिला मिळणारे लाभ... १) ऑफिस वेळेतुन एक तास सुट किंवा आठवड्यात एक दिवस लाडकी मैत्रीण रजा मिळणार... २) मैत्रिणीला फिरविण्यासाठी बाइक अथवा कार च्या पेट्रोल रकमेत ३०% सुट किंवा टॅक्सी ऑलॉउन्स देण्यात येणार... ३) पत्नी पासुन संरक्षण मिळणार.

नियम व आवश्यक कागदपत्रे... १) कमीत कमी एक मैत्रीण असावी... २) १ महिन्याचा व्हॉटसअॅप किंवा फेसबुक वरचे संभाषण अनिवार्य...

३) मैत्रीण तुमच्या बरोबर आनंदी आहे याचा पुरावा म्हणुन एक सेल्फि फोटो... ४) पुरुष हा वयाने चाळीशीचे पुढील असावा... ५) मैत्रीण दर सहा महिन्यांनी बदलली तरी चालेल... ६) ज्यांना लिहिता येत नाही त्यांनी रील करून पाठवावी.

या योजनेमुळे होणारे फायदे - १)पुरुषांची कार्यक्षमता वाढेल... २) इकडे तिकडे फिरण्याचे प्रमाण कमी होईल... ३) उगीचच ३/४ मैत्रिणीच्या मागे वेळ घालवणार नाही...४) पुरुष तणाव मुक्त जीवन जगतील...

यासाठी काही स्त्रियांनी सूचना केल्या...

आणि त्याही मान्य कराव्यात... यात अजून काही नियम व अटी सुचवाव्यात... सर्वांचे स्वागतच आहे... ज्या स्त्रिया लाडकी बहीण योजनेत समावेश करता येणार नाही त्यांच्यासाठी... लाडका मित्र योजना लागू करावी...

नियम व अटी आणि फायदे लाडकी मैत्रीण योजने प्रमाणेच असणार...

या दोन्ही योजना अमलात आणल्या तर स्त्री पुरुष समानता होईल आणि अनेक गुन्हे कमी होतील असे वाटते. कोर्ट आणि पोलीस डिपार्टमेंट वरील ताण खूप कमी होईल...




॥ज्योतिर्मय॥
साहित्याचे विद्यापीठ



## आठवणीतले बालपण

मित्रांनो, प्रत्येकाच्या आयुष्यात बालपणीचे विशेष महत्व असते, रम्य ते बालपण, खरंच बालपणीसारखी मज्जा परत कधीच येत नाही आता ते दिवस आठवले तरी मन खूप प्रसन्न होतं, तर आपण सर्वजण परत एकदा त्या बालपणीच्या विश्वात जाऊया, त्या आठवणींना एकदा उजाळा देऊयात ज्योतिर्मयच्या माध्यमातून. मग लिहायला सुरुवात करा व पटकन पाठवा मला 7743918559 या व्हाट्सअप नंबरवर


- संजय व्यापारी, संपादक,
ज्योतिर्मय साहित्याचे विद्यापीठ.

# स्वातंत्र्यचळवळीतील एक प्रेरणादायी अध्याय - भगवतीचरण वोहरा

**ज्योतिर्मय साहित्य**

२८ मे १९३० रोजी वयाच्या फक्त २६ व्या वर्षी बॉम्बची तपासणी करताना त्यामध्ये जबरदस्त स्फोट झाला आणि भगवतीचरण वोहरा हे स्वातंत्र्यलढ्यातील महत्वाचे स्वातंत्र्यसेनानी शहीद झाले. त्यांच्या मृत्यूमुळे चंद्रशेखर आझाद यांनी म्हंटले कि, त्यांचा उजवा हात कापला गेला आहे. तुरूंगात असलेले भगतसिंह म्हणाले ''आमचे तुच्छ बलीदान त्या साखळीची एक कडी आहे ज्याचे सौंदर्य कॉं. भगवतीचरण वोहराच्या दुःखद पण गौरवपूर्ण बलीदानामुळे निखळले आहे.'' भगवतीचरण वोहरा हे हिंदुस्थान समाजवादी प्रजातंत्र सेना पार्टीचे सदस्य आणि भगतसिंह सोबत एक प्रमुख सिद्धांतकार होते. त्यांना अटक करण्यासाठी ब्रिटीश पोलीसांनी जंग जंग पछाडले पण ते त्यांना अटक करू शकले नाहीत. काकोरी कांड किंवा सँडर्सची हत्या, प्रत्येक वेळी भगवतीचरण आरोपी बनले. व्हाइसरॉय लॉर्ड आयर्विन यांची ट्रेन बॉम्बने उडविण्याच्या प्रयत्नातही ते प्रमुख आरोपी होते. त्यांना अटक झाली असती तर त्यांची फाशी निश्चीत होती. भगवतीचरण वोहरा यांचे जीवन भारतीय स्वातंत्र्यचळवळीतील एक प्रेरणादायी अध्याय आहे. जेव्हा महात्मा गांधीनी द कल्ट ऑफ बम या लेखाव्दारे क्रांतीकारी गतिविधींची निंदा केली तेंव्हा चंद्रशेखर आझाद आणि भगतसिहांच्या सल्ल्यानुसार भगवतीचरण वोहरा यांनी द फिलॉसफी ऑफ बम नावाचा लेख लिहून आपली बौद्धिक प्रतिभा दाखवली. हा लेख भारतीय तरुणांमध्ये खूप लोकप्रिय झाला होता. ''मला अशा रीतीने मरायचे आहे की, कोणालाही त्याची माहिती होऊ नये आणि अश्रु सांडू नयेत'' असे ते कायम म्हणत. या भविष्य सूचक शब्दांचीच त्यांच्या सर्व मित्रपरिवाराला आठवण होत असे.

क्रांतीकारी विचारवंत, संघटनकर्ता, वक्ता, प्रचारक इत्यादी म्हणून भगवतीचरण सतत स्मरणात राहतात. यासोबतच आदर्शप्रती त्यांची अगाध निष्ठा, सुख दुःखाची पर्वा न करता सततच्या निर्धारित मार्गावर पुढे जाण्याचे त्यांचे धैर्य यासारखे त्यांचे वैयक्तिक गुण प्रत्येकाला त्यांच्याकडे आकर्षित करतात. भगतसिंह पर्वात धरपकडीचे जे सत्र सुरु झाले त्यात हिंदुस्थान समाजवादी प्रजातंत्र सेना संघटनेचे बहुतेक महत्वाचे कार्यकर्ते व विशेषतः सुखदेव सारखी संघटना कुशल व्यक्तिमत्वेही अटक झाल्यामुळे या संघटनेचे सेनापती चंद्रशेखर आझाद यांनी संघटनेचे पुर्नःसंघटन करून भगवतीचरण वोहरा व यशपाल सिंह यांच्यावर संघटनेच्या कार्याचा विशेष भार सोपविला होता. भगवतीचरण वोहरा यांच्या धर्मपत्नी दुर्गादेवी याही त्यांच्याबरोबर प्रत्यक्ष क्रांतीकार्यात पूर्वीपासूनच भाग घेऊ लागल्या होत्या. सुखदेव आणि इतरांच्या धरपकडीनंतर भगवतीचरण गुप्त होऊन कलकत्त्यात अज्ञातवासात राहून क्रांतीकार्य यशपाल सिंह यांच्यासह पुढे नेत होते. कलकत्त्याच्या पुढाऱ्यांची गुढमय वागणूक बघून हे दोघेही आपल्या कार्य क्षेत्रात येऊन बॉम्ब निर्मिती व इतर कार्य करीत राहिले. जम्मू येथे त्यांनी यशपाल सिंह यांनी संशोधिलेल्या नव्या बॉम्बचा अविष्कार केला पण स्फोट मोठ्या धडाक्याने होऊनही प्रत्यक्ष परिणामाच्या दृष्टीने तो अयशस्वी आहे असे आढळून आले. त्यानंतर हतोत्साह न होतां आधिक भयानक विस्फोटक पदार्थासाठी आवश्यक ते पिक्रिक अँसिड तयार करण्याची विशेष प्रक्रिया त्यांनी लाहोरच्या सरकारी कॉलेजचे रसायन शास्त्राचे तत्कालिन प्राध्यापक श्री. देवदत्त शर्मा यांच्याकडून हस्तगत केली. या गोष्टीचे विशेषज्ञ यतीन्द्रनाथ दास, सुखदेव व शिववर्मा हे अटकेत असल्यामुळे पुन्हा नव्याने सिद्धता करणे भाग होते. बॉम्बला आवश्यक त्या पदार्थाच्या सिध्द्तेची विद्या हस्तगत होताच इतर लहान लहान कामें हाती घेण्याऐवजी ब्रिटीश राजसत्तेचा या देशांतील सर्वश्रेष्ठ प्रतिनिधी जो व्हाइसरॉय त्यालाच त्याच्या गाडी सहीत मारण्याची योजना आखण्यात






आली होती. त्यामध्ये बॉम्बस्फोट झाला पण व्हाइसरॉय लॉर्ड आयर्विन वाचले. भगवतीचरण वोहरा यांच्या दोन मोठ्या कारवाया अयशस्वी झाल्या नसत्या तर भारतीय स्वातंत्र्य संग्रामाचा इतिहास काहीसा वेगळा असता. भगवतीचरण वोहरा वैचारिक दृष्ट्या अत्यंत परिपक्व असल्याने क्रांतीकारी कर्मात तसेच प्रत्येक वैचारिक लेखनात भगतसिंह यांच्यासोबत त्यांची जुगलबंदी होती. एक लिहिता तर दुसरा त्यांना दुरुस्त करतो असे घडायचे. ''नौजवान भारत सभा'' याचे किंवा ''हिंदुस्थान समाजवादी प्रजातंत्र सेना'' याचे घोषणापत्र असो,भगतसिंह आणि भगवतीचरण यांनीच लिहिले होते. भगवतीचरण वोहरा हे भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील एक अप्रतिम व्यक्तिमत्व होते. ते केवळ एक क्रांतीकारी नव्हते तर एक विचारवंत संघटक आणि लेखक देखील होते. त्यांच्या वैचारिक योगदानाने भारतीय क्रांतीकारी चळवळीला एक दिशा दिली. त्यांचे जीवन आणि कार्य आजही प्रेरणादायी आहे.

भगवतीचरण वोहरा यांचा जन्म १५ नोव्हेंबर १९०३ रोजी लाहोरमध्ये झाला. त्यांचे वडील शिवचरण वोहरा हे रेल्वेचे उच्च अधिकारी होते. शिवचरण वोहरा यांना इंग्रजी शासनाशी असलेल्या प्रामाणिक कर्तव्य करण्यामुळे रायबहाद्दूर या पदाने सन्मानित करण्यात आले होते. १५ वर्षे वय असताना १९१८ मध्ये भगवतीचरण वोहरा यांचे ११ वर्षीय दुर्गादेवी यांच्याशी विवाह करून देण्यात आला. १९१९ मध्ये झालेल्या जालीयनवाला बाग हत्याकांडाचा परिणाम त्यांच्यावर झाला आणि त्यांनी राष्ट्रवादी आंदोलनात उतरण्याचा वयाच्या १६ व्या वर्षी निश्चय केला. पहिल्यापासूनच आधुनिक विचारसरणीचे असल्याने त्यांनी दुर्गादेवी या आपल्या पत्नीस पुढील शिक्षण घेण्यासाठी चालना दिली होती. १९२१ साली महात्मा गांधी यांच्या आवाहनावर शिक्षण सोडून ते असहकार आंदोलनात सामील झाले. चौरी चौरा हत्याकांडच्या वेळी अचानक महात्मा गांधींनी असहकार आंदोलन मागे घेतल्याने त्यांनी आपले शिक्षण पुन्हा सुरू केले. लाहोर येथील लाला लजपतराय यांनी भारतीय विद्यार्थ्यांसाठी चालू केलेल्या लाहोर नॅशनल कॉलेजमध्ये ते दाखल झाले. याठिकाणी त्यांची प्रोफेसर जयचंद्र विद्यालंकार यांच्याशी ओळख वाढली,जे गुप्त क्रांतीकारी संघटना हिंदुस्थान रिपल्बीकन असोसिएशन चे सदस्य होते. त्यांच्यामुळे भगवतीचरण यांना क्रांतीकारी आंदोलनाची माहिती मिळाली. याच कॉलेजमध्ये त्यांची भगतसिंह, सुखदेव, यशपाल यांची व इतरांची गाठभेट झाली. जे सर्व एक विचाराचे होते. या सर्वांनी मिळून कॉलेजमध्ये शिक्षणाच्या काळात रशियन क्रांतीकारकांकडून प्रेरणा घेत विद्यार्थ्यांचे एक अभ्यासमंडळ स्थापन केले. ज्यामध्ये जगातील क्रांतीकारकांच्या विविध विचारसरणीचा आणि कार्यकर्तुत्वाचा आढावा घेतला जात असे. याच ठिकाणी या सर्वांचा स्वातंत्र्यलढ्यासाठी व्यापक वैचारिक दृष्टिकोन तयार झाला.

**(क्रमशः)**

# अक्षरब्रम्हात परतत्वाचा शोध घेणारी कवयित्री - संगीता वाणी

**ज्योतिर्मय साहित्य**

मध्यंतरी आमचे काही संशोधक विद्यार्थी नव्वदोत्तर कवींच्या काही अप्रकाशित कविता संकलित करीत होते. त्यात वैदर्भी, माणदेशी, खानदेशी, कोकणी, प.महाराष्ट्रातील अशा अनेक निवडक कविता होत्या. त्यातील खान्देशातील अहिराणी बोली आणि प्रमाण भाषेतील कविता मला एकाने वाचायला दिल्या.खान्देश म्हणजे बहिणाबाई चौधरींची भूमी. म्हणून त्यातील संगीता वाणी नावाच्या कवयित्रीच्या कविता वाचू लागलो. त्या कविता वाचताना वरवर मला प्रेम कविता वाटायच्या. पण जेव्हा लक्षणेने अर्थ घेऊ जायचा, तेव्हा त्यात दिसायची मीरा किंवा पंचलतिका नावाची गौळण! अशा बऱ्याच कविता वाचल्यानंतर एक लक्षात आले,ही कवयित्री सहसा अभिधेने प्रगट होतच नाही.लक्षणा किंवा जहद लक्षणा, अजहद लक्षणेने त्या शब्दरुप धारण करतात.वास्तवाचे भान नसते असे नाही पण त्यांची व्यक्त होण्याची शैली गूढवादी आहे. ग्रेस आणि वाणी यांच्या शब्दसौष्ठवात बरेचसे साम्य आहे. एकंदरीत कवितेचे अवलोकन करता, त्यांचे लेखन स्वांतसुखाय आहे. आत्मानंद हे त्यांच्या लेखनाचे मूळ आहे.



कुणाला आवडो न आवडो, अगदी परखडपणे त्या व्यक्त होतात. कविने कुणासाठी तरी लिहावं अशा पोटासाठी लिहीणाऱ्या कवींचा समाचार घेताना तुकोबा म्हणतात,

पोटापुरते कवी।झाले कलित बहुती।।

वाणींची कविता मिरवणाऱ्यांमधली नाही. आतुन जे येतं ते उत्स्फुर्तपणे मांडून त्या मोकळ्या होतात.प्रसिध्दीची कोणतीही अपेक्षा नाही. त्यामुळे समाजमाध्यमांवर त्यांच्या निवडक कविता आहेत. बाकी सर्व लेखन अप्रकाशित आहे.आम्ही भाषा संशोधन केंद्राच्या वतीने त्यांच्या कविता प्रकाशित करीत आहोत. लवकरच हा कविता संग्रह वाचकांच्या भेटीला येत आहे.

वाणींच्या वाचनाच्या व्यासंगामुळे त्यांच्या कवितेवर कधी बालकवींचा प्रभाव जाणवतो तर कधी अरुण कोलटकरांचा. कधी उच्च वेदांती तत्वज्ञान सांगणारी तुकोबांची विरहीणी दिसते तर कधी वास्तववादी कबीर!या सर्वांमध्ये वाणींच्या कवितेवर जास्त प्रमाणात संत मीराबाई, दादू, पलटू, जनाबाई यांची छाप जाणवली तरी त्या शेवटच्या कडव्यात स्वतःचेही तत्वज्ञान सहजपणे, नकळत सांगून जातात. बहुसांस्कृतिकतेमुळे वाणींची कविता प्रभाव आणि प्रभवाच्या माध्यमातून अभ्यासली तरी तिचे एक स्वतंत्र सत्व आणि स्वत्व आहे, की जे त्यांनी जपलेले आहे. सध्याच्या अस्वस्थ वर्तमानाचे काही अंशी प्रतिबिंब पडत असले तरी खान्देशातील संस्कृती व तेथील मातीचा मृदगंध या कवितेला लाभलेला आहे. कवित्वाला रसिकत्वाचा स्पर्श ठायी ठायी जाणवला तरी अंतिमतः परतत्वाची छोटीसी ठिणगी का होईना या कवितेत दिसते.

वाणींची कविता का वाचावी? तर मातीशी ईमान राखणारी,शब्दबंबाळ नसलेली, अल्पाक्षरत्व असलेली आणि स्वांतसुखाय लिहीलेली कविता काव्यगुणांनी संपन्न अशी आहे. या कवितेत मीरेची भक्ती आहे, राधेचे प्रेम आहे, तुकोबांचा जनकळवळा आहे, कबीरांचा बाजारवाद आहे. संतकवितेशी जवळचे नाते सांगणारी त्यांची कविता यमक, अलंकार यांची ओढाताण टाळून सहजपणे, हळुवारपणे मुक्तछंदात शब्दांची पखरण करते. ही कविता केवळ संवादी नाही तर आत्मसंवादी आहे,वाचकाला अंतर्मुख वृत्तीने वाचायला भाग पाडणारी आहे.

आज कवयित्री संगीता वाणींचा वाढदिवस!त्यांच्या हातून संतकवितेच्या जवळ जाणारे असेच लेखन होत राहो!त्यांना भविष्यातील शब्दांच्या सृजनोत्सवाच्या निर्मीतीसाठी अक्षर शुभेच्छा!अक्षरब्रम्हाची अक्षरसेवा तुका म्हणे पहा शब्दचि हा देव। या भूमिकेतून होत राहो,याच शुभेच्छा !

**– प्रा.डॉ.दत्तात्रय प्रभाकर डुंबरे**
प्रमुख, मराठी विभाग व भाषा संशोधन केंद्र,
विवेकानंद महाविद्यालय,
छत्रपती संभाजीनगर

**

# ओ मारिया....




**ज्योतिर्मय साहित्य**

मालती आणि तिचे मिस्टर रुटीन चेकप करायला गेले. दोघांच्याही महत्त्वाच्या तपासण्या झाल्या. मालतीचे वय साधारण ४५, तिच्या मिस्टरांचे ५१ वर्ष दोघांचाही एक मन एकमेकांवर भारी जीव. लग्नाला नुकतीच पंचवीस वर्षे उलटून गेलेली. मुले दोघेही उच्च शिक्षण घेत आहेत. दोघेही सरकारी नोकर. देवाच्या दयेने भरपूर मिळालं. संसारात दोघेही समाधानी. सुदैवाने दोनही मुलं आज्ञाधारक, संस्कारी, अजून तरी त्यांचे पराक्रम कानावर आलेले नाही, या आनंदातच दोन दिवसांनी रिपोर्ट आला, मालतीला शुगर तर तिच्या मिस्टरांना हाय बीपी आणि कोलेस्ट्रॉल !

झालं दोघांचेही चेहरे रिपोर्ट वाचून दिवसभर पडलेलेच ! संध्याकाळी दोघेही जड पावलाने डॉक्टरांच्याकडे गेले. तिकडे दुसरे काय मिळणार बरं? भरमसाठ, रंगीबेरंगी, वेडी वाकडी इंग्रजी नाव असलेल्या गोळ्या! मालतीला गोळ्यांच्या उग्र वासाने मळमळायला होतं. तिच्या मिस्टरांना तर गोळ्यांचा प्रचंड राग ! पण करणार काय? वैद्यकशास्त्रा पुढे सगळे शास्त्र क्षीणच ! दुसऱ्या दिवसापासून दोघेही निमूटपणे आपापले पथ्य सांभाळून लागले औषध घ्यायला !




तिसऱ्या दिवशी खरी गंमत झाली! कपड्याच्या घड्या करतांना अचानक काहीतरी आठवून मालती तिच्या मिस्टरांना म्हणते कशी,''आहो माझी ती संध्याकाळची गोळी आणि तुमची सकाळची सारखीच आहे ना ?'' ते निर्विकारपणे हो म्हणाले ! ''काय बरं नाव तिचं ?'' मालतीने पुन्हा प्रश्न केला.

एरवी शांत आणि अनरोमँटिक असणाऱ्या तिच्या मिस्टरांनी तिचा हात हातात घेऊन स्वतः कडे तिला ओढून घेतले !

आणि गायला सुरुवात केली अगदी तालासुरात!!

''निकार्डिया, निकार्डिया, निकार्डिया ओ हो हो ,,,
अरे, ना नी ने ना ना ना मुझसे,,
ना ना ना रे तुझसे, कैसे कहा था ये बता??
निकार्डिया, निकार्डिया ओ हो हो,,,!!''

मालतीच्या पोटात हसून हसून गोळा आला!

त्याला हळूच दूर ढकलत म्हणते कशी, ''यडपट !''

अजूनही ती हसतच होती. गाणं एक दुजे के लिए या चित्रपटातलं शब्द गोंधळात टाकणारे होते मात्र गाणं झक्कास जमलं होतं .

आता मात्र गोळीचे नाव तिच्या पक्क लक्षात राहिलं. Nikardia-xl 30 !! ती सुद्धा नंतर दिवसभर ओ मारिया, ओ मारीया

ऐवजी निकार्डिया, निकार्डिया असंच गुणगुणत राहीली,!


# प्रतिपंढरपूर - कर्जत

**ज्योतिर्मय साहित्य**

अहिल्यानगर जिल्ह्यात ''प्रति पंढरपूर'' म्हणून सुप्रसिध्द असलेले कर्जत! संजीवन समाधिस्त झालेल्या परम पूज्य श्री.गोदड महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेली भूमी! निस्सिम विठ्ठल भक्त व राजघराण्यात जन्म होऊन ही वैराग्य व हरी भक्ती करुन प्रत्यक्ष पांडूरंगाना पंढरीचा त्याग करुन एक दिवस कर्जतला आगमन करायला लावणारे सिध्द योगी पुरुष म्हणजे श्री. गोदड महाराज !

वडिल उदपूर (एम.पी.– यु.पी. सीमेवरील) घराण्यातील श्री.भिकाजी राजे भोसले तर माता चंद्रभागा कर्जतच्या तोडरमल घराण्यातील ई.सन १७५९ साली श्रावण शुध्द दशमी पुष्य नक्षत्रावर जन्म झाला. जन्मनांव अमरसिंह/ अमरनाथ होते. सुरुवातीचे बालपण राजवाड्यात गेले पण वयाच्या ६ व्या वर्षी राज वैभवाचा त्याग केला. विठ्ठल भक्तीत तल्लीन होऊन जंगलात फिरु लागले. सातपुडा पर्वत रांगेत वरील कासारबारी पठारावर विठ्ठल भक्तीचे चिंतन केले. त्याच काळात शांतिब्रह्म प.पू.संत श्री.एकनाथ महाराजांचे शिष्य परंपरेतील श्री.नारायण नाथ महाराजांच्या भेटीतून अनुग्रह प्राप्त केला. गुरु माऊली कडून गोदडी अंगावर टाकल्याने गोदडनाथ नामकरण झाले. ''अहं ब्रह्मास्मीसोहं ब्रह्मास्मी इदं''! चा अकरा वर्षे जप तप करत विठ्ठल रुखमाईंनी दर्शन दिले. पाच वर्षे विना आहार तपश्चर्येमूळे साक्षात विठ्ठलाने पंढरीला येण्याचे निमंत्रण दिले! फिरत फिरत ठाणे येथील माता वज्रेश्वरी दर्शन झाले. मंदिराच्या मागे नारायण गोसाई यांची भेट दिली. तेथे महाराजांच्या पादुकांची स्थापना झाली.

श्रीक्षेत्र देहू– आळंदी येथिल दर्शन घेत पंढरपूरला विठ्ठलाचे दर्शन घेतले. नंतर पिंपोडा (फलटण) येथिल मावशीची भेट घेऊन श्री. नानासाहेब शिर्के यांच्याकडे जेवण घेऊन फलटणला प्रस्थान केले. तेथे सगुणाबाई व त्यांचे पुत्र जणकोजीराजे यांना अनुग्रह दिला. कांही काळ फलटण येथे वास्तव्य करुन संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांच्या स्वप्नातील आदेशानुसार पंढरपूरला गेले. तेथे ११ वर्षे चातुर्मास केला. राहूटीत भक्ती व चिंतनसाठी वास्तव्य असे. ११ व्या वर्षी राहूट्यांच्या दोरीला पाय अडकून एक स्त्री पडली व जखमी झाली. त्या जखमी अवस्थेत अर्वाच्य भाषेत गोदड महाराजांना शिव्या देत होती. त्या स्त्रीच्या शिव्या महाराजांच्या जिव्हारी लागल्या महाराज मनी म्हणाले की, पांडुरंगा तुला माझा कंटाळा आला. व तुम्ही त्या स्त्रिच्या रुपाने बोलत आहेस... त्या प्रसंगातून महाराजांनी देह त्याग करण्याचा निर्णय घेतला. अंत्य समयी चे सर्व साहित्य घेऊन चिता रचली व चितेला प्रदक्षिणा घेऊन पेटत्या चितेत उडी घेणार तोच भगवान पांडुरंगाने मनुष्य रुप धारण करुन महाराजांचा हात धरला पुढील अनर्थ टळला. व पांडुरंगाने मुळ वेषात येऊन कर्जतला आषाढ वद्य पक्षात एकादशीला भेटीस येण्याचे वचन दिले.




नंतर महाराज वठारला व्यंकटराव वठारकर यांच्याकडे आले. त्यांना अनुग्रहीत करुन तीर्थयात्रेस प्रस्थान केले. नर्मदा परिक्रमा करुन हैद्राबाद येथे वास्तव्य केले तेथे निजाम राजाचे दिवाण श्री.चंदूलाल यांना अनुग्रह दिला. तेथील वास्तव्यात महाराज दर एकादशीला नगर प्रदक्षिणा करत. एका एकादशीला फकीरा ने दिंडी आडवली व तेथून परत दिंडी येणार नाही याची ताकीद दिली. नंतर फकीरा ने घेतलेल्या मुर्त्या दिवाण चंदुलाल मार्फत हस्तगत करुन फलटणला प्रयाण करत कर्जत येथे येऊन मामा निळोजी कारभारी तोडरमल कडे शेतात राहू लागले. नंतर त्यांनी तेथून कर्जत येथील शिष्या उमाबाई भिमराव काकडे यांच्या कडे वास्तव्य केले.

त्या काळात जग तारक गोदड रामायण, संत विजय, योग निर्णय, ६० वर्षाची सूत्रबध्द भविष्य शृंखला, अभंगवाणी इत्यादी ग्रंथ संपदा रचली.

नंतर २१ दिवस अनशन करुन माघ वद्य चतुर्थीला मंगळवारी (सन १८३७) दुसर्या प्रहरी समाधिस्त झाले. नंतर समाधीचे बांधकाम पूर्ण केले. कालांतराने महाराजांचे निस्सिम भक्त व मामलेदार श्री. विश्वनाथ कृष्ण गाडगीळ यांनी समाधीवर मेघडंबरी बांधली. पुढे गांवकऱ्यांनी मंदिराच्या पाषाण मंडपाचे बांधकाम केले.

दरवर्षी माघ वद्य चतूर्थीला भंडारा, श्रावण शुध्द दशमला जन्मोत्सव व आषाढ वद्य एकादशीला रथ यात्रा उत्सव असतो. भव्य लाकडी रथात पांडुरंगाची मुर्ती विराजमान असते!



हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559